# प्रथम भाषा : मराठी – इयत्ता : पाचवी

## महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे ३०.

### प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र

### शैक्षणिक प्रगती चाचणी : संकलित मूल्यमापन २ : २०१७–१८

### इयत्ता : पाचवी – विषय : मराठी (लेखी)

**विद्यार्थ्याचे नाव :** ______________________ **हजेरी क्रमांक :** [  ]

**शाळेचे नाव :** ______________________ **तुकडी :** ________

**केंद्र :** __________ **ता.** __________ **जि.** __________ **दिनांक :** / /२०१८

| | लेखी | | | | | | तोंडी | | | प्राप्त गुण | | | शिक्षक स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रश्न क्रमांक | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | मूलभूत क्षमता प्रश्न क्र. १ व ८ | इयत्तेच्या क्षमता | एकूण | |
| प्राप्त गुण | | | | | | | | | | | | | |
| कमाल गुण | ५ | ५ | ५ | ५ | १० | ५ | ५ | ५ | ५ | १० | ४० | ५० | |

**प्र. १.** शब्द ऐकून लिही. (गुण ५)

१) ______________ २) ______________

३) ______________ ४) ______________

५) ______________ ६) ______________

७) ______________ ८) ______________

९) ______________ १०) ______________

**प्र. २.** खालील उतारा मनात वाच आणि प्रश्नांची उत्तरे लिही.

माणिकच्या वडिलांचे नाव बंडोजी इंगळे ठाकूर व त्याच्या आईचे नाव मंजुळा. तो लहान असताना त्याच्या आईने त्याला आपल्या आजोळी वरखेडला नेले. तिने त्याला आडकोजीमहाराजांच्या सान्निध्यात ठेवले. महाराजांनी त्याला 'तुकड्या' हे नवे नाव दिले. तुकडोजीने त्यांना गुरू मानले.

तुकडोजी चौदा वर्षांचे असतानाच त्यांनी घर सोडले व ते रामटेकच्या जंगलात भटकू लागले. तेथे कंदमुळांवर गुजराण करत त्यांनी हठयोगाचा अभ्यास केला. त्यानंतर चंद्रपूर जिल्ह्यातील आदिवासींचे पाडे व भटक्यांची पाले धुंडाळत ते फिरले व तेथील गरीब माणसांमध्ये रमले. खेळ, शर्यतींमध्ये पोहणे, धावणे, घोड्यावर-बैलगाड्यांवर नियंत्रण साधणे, गाणे रचणे, वाद्य वाजवणे, मोठ्या ढोलांच्या तालावर नाचणे अशी विविध कौशल्ये त्यांनी आत्मसात केली. हिंदी, उर्दू व मराठीतील स्वत:चीच कवने ते खंजिरीच्या तालावर बेभान होऊन गात असत. ऐकणारे तल्लीन होऊन तासन्तास डोलत असत. त्यांच्या या आगळ्या गुणसंपदेमुळे लोक त्यांना 'देवबाबा' म्हणू लागले.

**अ)** तुकडोजींचे पूर्ण नाव काय? योग्य पर्यायाच्या क्रमांकास गोल कर. (गुण १)

१) माणिक बंडोजी इंगळे ठाकूर

२) तुकडोजी खंडोजी ठाकूर

३) बंडोजी इंगळे ठाकूर

**ब)** तुकडोजी कोणकोणत्या भाषेत कवने रचून गात असत? (गुण २)

______________________________

______________________________

**क)** तुकडोजींनी कोणकोणती कौशल्ये आत्मसात केली? (गुण २)

______________________________

______________________________

______________________________

**प्र. ३.** खालील कविता मनात वाच आणि प्रश्नांची उत्तरे लिही.

ओढाळ वासरू रानी आले फिरू,
कळपाचा घेरू सोडूनिया.

कानामध्ये वारे भरूनिया न्यारे,
फेर धरी फिरे रानोमाळ.

मोकाट मोकाट अफाट अफाट,
वाटेल ती वाट धावू लागे.

विसरूनी भान, भूक नि तहान,
पायांखाली रान घाली सारे.

थकुनिया खूप सरता हुरूप
आठवे कळप तयालागी.

फिरू जाता मागे दूर जाऊ लागे,
आणखीच भागे भटकत.

पडता अंधारू लागले हंबरू,
माय! तू लेकरू शोधू येई.

**अ)** कवितेत 'ओढाळ' हा शब्द कोणासाठी वापरला आहे? (गुण १)
योग्य पर्यायाच्या क्रमांकास गोल कर.

१) कोकरू २) शेकरू ३) वासरू

**ब)** हिंडताना वासरू काय काय विसरले? (गुण २)

**क)** वासराने कळप सोडल्यामुळे काय-काय घडले? (गुण २)

**प्र. ४.** खालील निवेदनाचा नमुना वाच आणि प्रश्नांची उत्तरे लिही.

## जाहीर निवेदन

**दि. १ जानेवारी २०१८ :** सर्व जनतेस 'जाहीर निवेदन' करण्यात येते की, 'स्वच्छ भारत मिशन' अंतर्गत पथनाट्य आणि कलापथकाच्या माध्यमातून गावोगावी जनजागृती करावयाची आहे.

या उपक्रमासाठी इच्छुक पथनाट्य मंडळांनी व कलापथकांनी दिनांक ५ जानेवारी रोजी ढोल, मृदंग, वेशभूषा, ध्वनीक्षेपक इत्यादी साहित्यासह जिल्हा परिषदेच्या मुख्य सभागृहात सादरीकरणासाठी सकाळी १० वाजता उपस्थित राहावे. निवड समिती योग्य त्या मंडळांची/कलापथकांची निवड करेल. निवड झालेल्या मंडळास कलापथकास मानधन देण्यात येईल.

स्वच्छता व पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, बुलडाणा.

**अ)** हे निवेदन कोणत्या विभागाकडून करण्यात आले आहे? (गुण १)

______________________________

______________________________

**ब)** कोणकोणत्या माध्यमातून गावोगावी जनजागृती करण्यात येणार आहे? (गुण २)

______________________________

______________________________

**क)** सादरीकरणासाठी कोणकोणत्या साहित्यासह व किती वाजता उपस्थित राहण्यास कळविले आहे? (गुण २)

______________________________

______________________________

**प्र. ५.** खालील प्रश्न दिलेल्या सुचनेनुसार सोडव.

**अ)** प्रत्यय लावून शब्द बनवून लिही. (गुण १)

जसे : धीट - धिटाई

तसे : चपळ - ____________________

**ब)** खालील वाक्यात योग्य ठिकाणी विरामचिन्हांचा वापर करून वाक्य पुन्हा लिही.

''अशी पळत का आलीस हळू यायचंस'' (गुण १)

________________________________________

**क)** खालील वाक्यातील 'नाम' ओळखून त्या नामावरून नवीन वाक्य पुन्हा लिही. (गुण १)

ती खूप छान चित्र काढते.

नाम : ________________

वाक्य : ________________________________________

**ड)** कंसातील योग्य त्या सर्वनामाचा वापर करून रिकाम्या जागा भर. (गुण २)

(मी, ती, आम्ही, त्यांनी)

आमच्या शाळेत विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. __________ सर्वजण खूप उत्साही होतो. उद्घाटनाला प्रमुख पाहुणे आले. साक्षीने स्वागत गीत म्हटले. __________ खूप आनंदी होती. दोन्ही दिवशी __________ प्रयोग सादर केला. प्रमुख पाहुण्यांनी माझे कौतुक केले. __________ आम्हांला मार्गदर्शन केले.

**इ)** पुढील वाक्यातील अधोरेखित शब्दसमूहाऐवजी कंसातील योग्य वाक्प्रचाराचा वापर करून वाक्य पुन्हा लिही.

(हुरळून जाणे, कंबर कसणे, कच खाणे) (गुण १)

पतीच्या निधनानंतर गोदावरी मुलांच्या शिक्षणासाठी झपाटून कामाला लागली.

______________________________

______________________________

**फ)** खालील वाक्यातील रिकाम्या जागी कंसातील क्रियापदाचे योग्य रूप लिही. (गुण १)

बाहेरगावी गेलेली निकिता कालच परत ________ (येणे)

**ग)** 'वाचणे' या क्रियापदाचे भुतकाळी रूप वापरून वाक्य पूर्ण कर. (गुण १)

विजयने गोष्टीचे पुस्तक ________

**ह)** कंसात दिलेल्या विशेषणांपैकी योग्य विशेषण रिकाम्या जागी लिही.
(ऊबदार, भुरभुर, गोड, चाळीसावा, दहावा) (गुण २)

१) अमितने तिला ________ पेरू दिला.

२) रजनी ________ दुलईतून बाहेर पडली.

३) बाहेर पावसाची ________ सुरू होती.

४) काल बाबांचा ________ वाढदिवस होता.

**प्र. ६.** खाली दिलेल्या प्रसंगाच्या आधारे एक गोष्ट लिही. (गुण ५)

शाळेत क्रीडा स्पर्धा होत्या. क्रिकेटची मॅच सुरू होती. मुले आनंदाने जल्लोष करीत होती. विजय फलंदाजी करीत होता. मुले वि ऽऽ जय, वि ऽऽ जय असे ओरडत होती.

**प्र. ७.** खाली काही शब्द दिलेले आहेत. त्या शब्दांच्या आधारे गोष्ट तयार करून लिही. (गुण ५)

झोपडी, उंट, पेन्सिल, सायकल

■■■